Exh 29/D

रे. क. नं. ५९/२०२६

# पेठवडगाव, येथील मे. दिवाणी न्यायाधीशसो क. स्तर, यांचे कोर्टात...

श्री. मोहन विलास पाटील ------ वादी

विरुद्ध

श्री. विलास निवृत्ती पाटील ----- प्रतिवादी

वगैरे

**सि.पी.सी.ऑ. ४१ रूल ५ (२) प्रमाणे अर्ज**

**यातील प्रतिवादी यांचा विनंती अर्ज असा की,**

१. सदरचे कामी वादी यांचा नि. ५ वरील अर्ज मे. कोर्टांनी दि.२४/०४/२०२६ इ. रोजी मंजूर केलेला आहे. तसेच सदर आदेशाचे अवलोकन करीता दावा मिळकतीचे वाटप झालेले नाही. व वाद मिळकतीमध्ये वादीस हक्क येतो या निर्णयापर्यंत येऊन प्रतिवादींचे सर्वसाधारणपणे र.रु. १२,००,०००/- (अक्षरी रुपये बारा लाख फक्त) इतकी कर्जाऊ रक्कम घेऊन सदर ठिकाणी प्रतिवादी नं. ३ यांनी १ हजार ५० चौ. फूट क्षेत्रामध्ये स्लब लेवल पर्यंत बांधकाम केलेले आहे. परंतु केवळ स्लब टाकणेचे वेळी मे. कोर्टाचा नि. ५ वरील आदेश झालेणे प्रतिवादी नं. ३ यांनी सर्वसाधारणपणे र.रु. १५,००,०००/- अथवा त्याहून अधिक रक्कम गुंतवून कायदेशीररीत्या वाटून विभागून आलेले मिळकतीमध्ये कायदेशीररीत्या बांधकाम करीत असलेणे त्यास वादीस हरकत घेणेचा कोणताही हक्क व अधिकार नसताना तसेच वादीने

O.S to say

Sd/-
I/C Jt CJJD pethvadgaon

सहाय्यक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
पेठ वडगांव

आपले हिस्सेची मिळकत रजि. दस्ताने श्री. आनंदराव बाबुराव पाटील यांना विक्री केलेली असलेणे वादीचा नि. ५ वरील अर्ज वाटपा बाबतचे खरी वस्तुस्थिती मे. कोर्टा समोर न आलेणे सदरचा अनावधानाने मंजूर झालेला आहे.

२. वरीलप्रमाणे परिस्थिती असताना वादी, प्रतिवादी दरम्यान झालेले वाटपा बाबतची खरी वस्तुस्थिती मे. कोर्टासमोर येणे करीता प्रतिवादी यांनी सदर कामी नि. २७ ला कैफियत दुरुस्तीसाठी अर्ज दाखल केलेला आहे. याशिवाय नि. ५ वरती झाले आदेशाचे पूर्णअवलोकन करून नि. ५ वरील अर्ज नामंजूर होणे करीता प्रतिवादी यांनी नि. २२ अर्ज दाखल केलेला आहे. त्याकारणाने मे. कोर्टांनी नि. ५ वरती केलेला आदेश नि. २२ वरील आदेशांपर्यंत स्थगिती ठेवणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत आवश्यक व अगत्याचे आहे.

३. प्रतिवादी यांनी मागणी केले प्रमाणे नि. ५ वरती झालेला आदेश स्थगित न ठेवलेणे प्रतिवादी यांचे कायदेशीर हक्क डावलले जाणेची दाट शक्यता आहे. व प्रतिवादी यांचे वर घोर अन्याय होणार आहे. याउलट प्रतिवादी यांनी मागणी केले प्रमाणे नि. ५ वरती झालेला आदेश स्थगित ठेवलेणे वादी यांचे कोणतेही नुकसान होणेचा संभव देखील नाही.

४. **<u>सबब प्रतिवादी यांची नम्र विनंती</u>**

अ. सि.पी.सी.ऑ ४१ रूल ५ (२) प्रमाणे मे. कोर्टाचे नि. ५ वरती झाले आदेशास नि. २२ वरील आदेशांपर्यंत स्थगिती मिळावी.

आ. न्यायाचे सर्व हुकुम प्रतिवादी यांचे वतीने व्हावेत.

येणे प्रमाणे अर्ज असे

पेठवडगाव

ता.०९/०६/२०२६

मे.जा.व्हावे.

1) विकास निवृत्ती पाटील

2) [signature]

3) WPatil

सहाय्यक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
पेठ वडगांव

## ॥ प्रतिज्ञा ॥

आम्ही यातील प्रतिवादी सत्य प्रतिज्ञेवर व देवाचे शपथेवर कथन करतो की, वरील अर्जातील मधील संपूर्ण मजकूर आमचे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली सत्य प्रतिज्ञा.

पेठ वडगांव मे.जा.व्हावे.

ता. १०/०६/२०२६

१. विकास निवृत्ती पाटील

२. [signature]

३. VPatil

## ॥ ॲफिडेव्हिट ॥

मी प्रतिवादी नं. ३ श्री. विकास विलास पाटील, व.व. ५३, धंदा-शेती, रा. टोप, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. सत्य प्रतिज्ञेवर व शपथेवर कथन करतो की, व वरील अर्जा मधील सर्व मजकूर माझे माहीतीच समजुती प्रमाणे खरा व बरोबर म्हणून ॲफिडेव्हिट केले.

पेठवडगाव मे.जा.व्हावे.

ता. १०/०६/२०२६ VPatil

मी ॲफिडेव्हीट करणार यांना ओळखतो

Jadhav Adv

ॲडव्होकेट् Adv. M.M. Jadhav For defendant

सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
पेठ वडगांव